**स्थायी निदेश क्र.१३-२०२४**

**विभागीय स्तरावरील आणि जिल्हाधिकारी कार्यालय बैठकीमध्ये राज्यातील नगरपरिषदांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी मार्गदर्शक सुचना.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका जुनी इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१४**
**क्र.नपप्रसं/प्र.क्र.२७/स्थायी नि.१३/२०२४ /वि. जिल्हा. स्तर बै.न.प.काम.आ.मार्ग./कक्ष-१२/६५५७**
**दिनांक -: 15 OCT 2024**

**वाचा:-** १) या संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.३ क्र.२०००/प्र.क्र. २४/२०००/८ दि. १५- ०८-२०००

२) या संचालनालयाचे पत्र क्र.संकीर्ण २०००/प्र.क्र. २४/२०००/८ दि. ०१-०१-२००१

३) या संचालनालयाचे पत्र क्र.न.प.सं/नगरपरिषद नियंत्रण/२००५/प्र.क्र.३७३/३२ दि.११-०५-२००५.

४) या संचालनालयाचे पत्र क्र.न.प.सं/नगरपरिषद नियंत्रण/२००५/प्र.क्र.३७३/३२ दि. २५-१०-२००५

५) या संचालनालयाचे पत्र क्र.न.प.सं/नगरपरिषद नियंत्रण/२००५/प्र.क्र.४४२/३२ दि. ०८-०६-२००५

६) या संचालनालयाचे पत्र क्र.सहा.अ /प्र.क्र.१/४५/२००५/ दि. २१-०८-२००६

७) या संचालनालयाचे पत्र क्र.न.प.सं /परिपत्रक-नस्ती /२०२३/कक्ष-१/५२६० दि. २७-०९-२०२३

८) या संचालनालयाचे पत्र क्र.न.प.सं /का-११/२०२३/बैठक /५७९५ दि. २३-१०-२०२३

**प्रस्तावना :-**

राज्याच्या नागरीकरणाच्या वेगात वाढ होत आहे, नागरीकरणाचे प्रमाण ५०% पर्यन्त पोहचले आहे. ७४ व्या घटनादुरुस्ती मुळे नगरपरिषदांचे कर्तव्य व जबाबदारी मध्ये वाढ झाली आहे. नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा व सुविधा यांचा दर्जा चांगला राहावा तसेच यावरील होणारा खर्च भागविण्यासाठी कर वसूलीची टक्केवारी चांगली राहावी, वित्तीय शिस्त व व्यवस्थापनाच्या दर्जामध्ये सुधारणा व्हावी तसेच नगरपरिषदेचा कारभार पारदर्शक व लोकाभिमुख रहावा. नगरपरिषदेच्या कामकाजातील गैरप्रकारांना आळा बसून कामकाजात सुधारणा होण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संदर्भ क्र. ३ अन्वये नगरपरिषदेसाठी २० कलमी कार्यक्रम निश्चित करण्यात आला होता. या २० कलमी कार्यक्रमाची मुद्धेनिहाय प्रतवारी संदर्भ क्र. ५ नुसार ठरविण्यात आली होती. या दोन्ही संदर्भानुसार निश्चित केलेला कार्यक्रम व प्रतवारी मध्ये सध्याच्या परिस्थितीत बदल करणे आवश्यक आहे. त्यानुसार सुधारित २० कलमी कार्यक्रमाची मुद्देनिहाय व प्रतवारी खाली नमूद

करण्यात आली आहे. राज्याच्या नागरीकरणाचा वेगात वाढ होत आहे त्यांचे प्रमाण ५० टक्केपर्यंत पोहचले आहे.

**आदेश :-**

राज्यातील नगरपरिषदांचे कामकाज अधिक गतिमान करण्यासाठी व त्यावरील नियंत्रणासाठी २० कलमी कार्यक्रम खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे. मुद्दा क्र. १ ते७ हा वित्तीय शिस्त व आर्थिक स्थिती बळकट करण्याबाबत आहे. मुद्दा क्र. ८ व ९ हे कामकाजात शिस्त व पारदर्शकता या संबंधीचा आहे, मुद्दा क्र. १० ते १४ हे नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवासुविधा व दर्जा सुधारणे तसेच विकासाच्या संबंधित आहे. मुद्दा क्र. १५ ते १८ हे शासनाच्या विविध योजनांची अमलबजावणी यासंबंधीचा आहे. मुद्दा क्र. १९ व २० हे नगरपरिषदेच्या वैशिष्टपूर्ण कार्यासंबंधीचा आहे.

| अ क्र | कलम | अंतर्गत मुद्दे |
|---|---|---|
| १ | नगरपरिषद स्वनिधीचा अहवाल | १. मालमत्ता कर मागणी व वसूली<br>२. पाणी पट्टी मागणी व वसूली<br>३. नगरपरिषद मालमत्ता यांच्यापासून मिळालेल्या महसूलाचे उत्पन्न वाढविण्यासाठी उपयोजना (उदा. दुकानगाळे भाड्याच्या दराचे पुर्नविलोकन)<br>४. इतर कर<br>५. विकास शुल्क<br>६. उपयोगिता सेवा आणि संकीर्ण बाबीपासूनचे उत्पन्न<br>७. मालमत्ता कर चतुर्थ वार्षिक आकारणी व नवीन मालमत्ताचा शोध घेऊन कर लावणे<br>८. अनधिकृत नळांवर कारवाई<br>९. नगरपालिकेचे स्व उत्पन्न वाढविण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना |
| २ | कार्यालय व्यवस्थापन/ आस्थापना/ **संवर्ग कर्मचारी आस्थापना/ नगरपरिषद कर्मचारी आस्थापना /** | १. सेवाजेष्ठता यादी प्रसिध्दी<br>२. नगरपरिषद कर्मचारी सेवापुस्तक अद्ययावत करणे/ सेवापुस्तक प्रमाणित करणे<br>३. शिस्तभंग विषय कार्यवाही<br>४. प्रशिक्षण<br>५. गोपनीय अहवाल प्रतिवेदन व पुनर्विलोकन<br>६. वर्षाची आश्वासीत प्रगती योजना लाभ<br>७. मंजूर रिक्त/ भरलेल्या पदांचा आढावा<br>८. सेवानिवृत्त कर्मचारी देय थकीत रक्कम<br>९. सेवानिवृत्त कर्मचा-यांना सेवा उपदान व रजा रोखीकरणाची देय थकीत रक्कमेसाठी शासना कडून अनुदान मिळणे आवश्यक<br>१०. विहित कालावधीत बिंदू नामावली नोंदवही पडताळणी करणे.<br>११. सहा गठ्ठा पद्धती नुसार अभिलेख जतन<br>१२. नगर परिषद कार्यालय इमारत |

| | | |
|---|---|---|
| | | १३. मुख्याधिकारी निवासस्थान बांधकाम<br>१४.नगरपरिषद कर्मचारी यांचे NPS बाबत कार्यवाही करणे |
| ३ | पायाभूत सुविधा | १. पाणीपुरवठा व्यवस्था- उत्पन्न खर्च ताळमेळ, योजनेची प्रगती<br>२. मलनिस्सारन व्यवस्था - उत्पन्न खर्च ताळमेळ, योजनेची प्रगती<br>३. रस्ता व नाली |
| ४ | शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग व प्रगती | १. १४ योजना बाबत निधी विनियोग<br>२. नगरोत्थान राज्यस्तर योजना<br>३. अमृत योजना<br>४. जिल्हा वार्षिक योजना |
| ५ | घरकुल योजना आढावा | १. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)<br>२. इतर (उद्दिष्ट, मंजूर, पूर्ण इत्यादी) |
| ६ | नगर रचना | १. विकास आराखडा मधील आरक्षणे विकसित करणे<br>२. बांधकाम परवाने : BPMS अंतर्गत प्राप्त,निकाली प्रकरणे आढावा<br>३. अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे<br>४. ROW परवानगी<br>५. PM गतीशक्ती<br>६. मोबाईल टॉवर |
| ७ | आक्षेप अनुपालन | १. स्थानिक लेखा निधी<br>२. महालेखापाल यांचे आक्षेप<br>३. स्थायी निदेश १३ अंतर्गत कार्यवाही<br>४. आयुक्त तथा संचालक कार्यालयाने केलेल्या तपासणीतील आक्षेप |
| ८ | लोकायुक्त व न्यायालयीन प्रकरणे | १. लोकायुक्त<br>२. न्यायालयीन प्रकरणे |
| ९ | घनकचरा व्यवस्थापन ब स्वच्छ सर्वेक्षण संबंधित | १. कचरा विलगीकरणाचे प्रमाण<br>२. कचरा प्रक्रिया<br>३. प्लास्टीक बंदी<br>४. हरित ब्रँड ची नोंद व मिळणारे उत्पन्न<br>५. कचरा संकलन उपयोग कर्ता शुल्क<br>६. प्लास्टिक व स्वच्छता अनुषंगाने करण्यात येणारी शास्ती<br>७. सार्वजनिक शौचालय स्थिती<br>८. स्वच्छ सर्वेक्षण आनुषंगिक तयारी |
| १० | वृक्षारोपण व उद्यान विकास | १. वृक्षारोपण कार्यक्रम<br>२. घनवन विकास<br>३. उद्यान वाढविण्यासाठी व जगविण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना<br>४. माझी वसुंधरा अभियान आनुषंगिक तयारी<br>५. वृक्षगणना |
| ११ | दिवाबत्ती | १. (पथदिव्यांचे LED करण करणे बाबत आढावा)<br>२. सौर उर्जेचा वापर |

| | | |
|---|---|---|
| | | ३. उर्जा बचत प्रकल्प |
| १२ | आरोग्य व सामजिक कल्याण | १. NUHM (लागू असल्यास)<br>२. सर्व राष्ट्रीय /राज्य अभियाने |
| १३ | शिक्षण | १. पट संख्या<br>२. पट संख्या वाढविणे करिता उपाययोजना<br>३. Smart Class Room |
| १४ | DAY NULM | १. SEP बचतगट, व्यक्तीगत कर्ज माहिती.<br>२. CLC कार्यान्वयन<br>३. SMID बचतगट स्थापना, फिरता निधी वाटप बाबत माहिती, बचत गट उद्योग<br>४. SUSV फेरीवाला सर्वेक्षण, शहर फेरीवाला समिती स्थापना इत्यादी माहिती<br>५. पथ विक्रेता योजना, विक्री ना विक्री क्षेत्र<br>६. SUH बेघर निवारा माहिती, निवारा संख्या वाढविणे, बेघरांचे पुनर्वसन<br>७. उद्योजगता प्रशिक्षण कार्यक्रम (EDP)<br>८. PM Svanidhi/महिला बचत गट स्वनिधी से समृद्धी आढावा |
| १५ | E Governance | १. Ease of Doing Business अंमलबजावणी<br>२. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 अंमलबजावणी<br>३. e-Office /e-HRMS/Mahapar प्रणाली अंमलबजावणी<br>४. नगरपरिषद/नगरपंचायतींची संकेस्तळे अद्ययावत ठेवणे<br>५. ICT based solid waste management project implementation<br>६. IWBP विविध Modules अंमलबजावणी बाबत<br>७. संचित पोर्टल वर माहिती अद्ययावत करणे |
| १६ | माहिती अधिकार कायदा व सेवा हमी कायदा याची अमलबजावणी | १. माहिती अधिकार कायदा<br>२. नागरिकाची सनद व माहिती अधिकार कायदा २००५, ४(ख) नुसार माहिती प्रसिद्ध करणे |
| १७ | वरिष्ठ कार्यालयाचे निर्देश | १. आयुक्त तथा संचालक, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांनी नेमून दिलेल्या विशेष कामाबाबतची कार्यवाही<br>२. आयुक्त तथा संचालक कार्यालयाकडून मागविण्यात आलेली माहिती विहित मुदतीत सादर करणे<br>३. |
| १८ | विशेष योजना | १. केंद्र / राज्य शासनाकडून वेळोवेळी घोषित होणारे महत्वाकांक्षी अभियाने<br>२. शहरामध्ये फुटपाथ, पे अँड पार्क, ग्रंथालय/ अभ्यासिक, सौंदरीकरण, खेळाचे मैदान, व्यायामशाळा, जलतरण तलाव, नाट्यगृह इत्यादी अमलबजावणी.<br>३. वर्षभरात मुख्याधिकारी यांनी स्वतः निवडलेले इतर उल्लेखनीय अशी महत्वाची व वैशिष्ट्यपूर्ण कामे, स्वतःचे उपक्रम यांबाबत माहिती |
| १९ | वंचित घटकासाठी | १. दिव्यांग कल्याण योजना |

| | | |
|---|---|---|
| | उपाययोजना (निधी,गाळे वाटप इत्यादि) | २. महिला व बालकल्याण योजना<br>३. मागासवर्गीय कल्याण योजना<br>४. अल्पसंख्यक घटकांबाबत योजना |
| २० | आपत्ती व्यवस्थापन | १. अग्निशमन<br>२. पुरसंबंधी बचाव पथक<br>३. धोकादायक इमारती निष्कासित करणे<br>४. पाणी टंचाई उपायोजना |

जिल्हा सह आयुक्त यांनी वरील सुधारित २० कलमी कार्यक्रमाची प्रपत्रे आपल्या स्तरावर तयार करावीत व त्या प्रपत्राच्या आधारावर प्रती महा सर्व नगरपरिषदांचा आढावा घ्यावा व तसा अहवाल आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना दरमहा पाठवावा. प्रादेशिक विभागीय संचालनालयाने या मुद्यावर प्रती तिमाहीला एक बैठक आयोजित करणे अपेक्षित आहे.

तसेच वरील वाचा क्र. ७ व ८ संचालनालयाचे आदेश व पत्रासोबतचे विषयाची यादी व विषय निहाय प्रपत्र नमुना प्रपत्रामध्ये अद्यावत करण्याची कार्यवाही आपल्या विभागातील सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती यांची मुद्धेनिहाय एकत्रितरीत्या माहिती व त्या विषयाबाबत आढावा बैठक हे प्रती महा एक वेळा जिल्हा सह आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावरून, २ महिन्यातून एक वेळा विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय स्तरावरून व ३ महिन्यातून एक वेळा संचालनालयाच्या स्तरावरून आढावा बैठक घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

वरील स्थायी निदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

Signed by
Manoj Vijay Ranade
Date: 15-10-2024 17:58:27

**(मनोज रानडे भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय नवी मुंबई**

प्रति,

१) विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व).

२) जिल्हा सह आयुक्त , नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व).

३) अध्यक्ष/ प्रशासक , नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).

४) मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).

प्रत माहितीसाठी सविनय सादर :

१) मा. प्रधान सचिव ( २ ), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) विभागीय आयुक्त , नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).

३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.

४) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा,सर्व विभाग.

५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई (सर्व कार्यासन).

६) निवड नस्ती.